## अमरावती महानगरपालिका, अमरावती
## दिनांक ०३.११.२०२२ रोजी प्राप्त प्रशासकीय विषय

**(प्रशासकीय विषय)**

**विषय क्रमांक ४१ :-** महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग, अधिसुचना दिनांक ०९ मे २०२२ मध्ये नमुद केल्याप्रमाणे सदर अधिसुचनेतील नियम २० अन्वये तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ७९ (ड) अन्वये महानगरपालिका क्षेत्रातील जाहिराती करीता जागा भाडे निश्चित करण्यास मान्यता प्रदान करण्या बाबत.

**ठराव क्रमांक ४१ :-** महाराष्ट्र शासन नगरविकास विभागामार्फत, दिनांक ०९ ते २०२२ रोजी जाहिरात बाबत अधिसुचना निर्गमित करण्यात आलेली आहे. महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम (१९४९ चा ५९) याची कलमे २४४ व २४५ आणि कलम ४५६ अ चे पोटकलम (१) याद्वारे प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन महाराष्ट्र शासन, उक्त कलम ४५६ अ च्या पोट कलम (२) द्वारे आवश्यक असल्याप्रमाणे, पूर्वप्रसिध्दी नंतर आणि महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमान्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन, त्याबाबतीत महाराष्ट्र शासनाने आणि महानगरपालिकांनी प्रसिध्द केलेले मुंबई प्रांतिक महानगरपालिका (जाहिरात व फलक नियंत्रण) नियम, २००३ आणि इतर सर्व नियम, आदेश, संलेख यांचे अधिक्रमण करुन, महानगरपालिका क्षेत्रातील आकाशचिन्हे आणि जाहिरात प्रदर्शनाचे नियमन व नियंत्रण करणारे नियम करण्यात आलेले आहेत.

उक्त नियमांना महाराष्ट्र महानगरपालिका (आकाशचिन्हे (स्कायसाईन) व जाहिरात प्रदर्शित करण्याचे नियमन आणि नियंत्रण) नियम २०२२ असे म्हणावे, सदर नियमातील २० अन्वये तसेच महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाचे कलम ७९ (ड) अन्वये जागा भाडे निश्चिती करण्याचे संदर्भात खालील प्रमाणे निश्चित करण्यात येत आहे.

**जाहिरात अंतर्गत जागा भाडे**

महानगरपालिका मालकीच्या जमिनीवर उभारलेल्या/लावण्यात आलेल्या सर्व प्रकारच्या जाहिरातींकरीता जागा भाडे हे त्या त्या वेळी प्रचलित असलेल्या बाजारमुल्य दर तक्ता मध्ये नमुद असलेले जागेचे भाडे अधिक त्यावर लागणारा जीएसटी यांप्रकारे सहाय्यक संचालक नगर रचना विभाग मार्फत वेळोवेळी निश्चित करण्यात येईल.

उक्त नमुद केल्याप्रमाणे महापालिका क्षेत्रांतर्गत महापालिका मालकीच्या जागेवरील जाहिराती करीता जागा भाडे चे दर निश्चित करण्यास मा. आयुक्त यांनी दिनांक १८.१०.२०२२ रोजी प्रशासकीय मान्यता प्रदान केलेली असुन त्या अनुषंगाने व मा. मुंबई उच्च न्यायालयातील जनहित याचिका क्र. १५५/२०११ अंतर्गत निर्गमित आदेशानुसार महानगरपालिका क्षेत्रामधील सर्व ५ झोन निहाय लावण्यात येणारे जाहिरातीचे जागा भाडे वसुली बाबत पुढील अनुषंगीक कार्यवाहीस्तव सदर प्रशासकीय विषयास मा. सर्वसाधारण सभेची मंजुरात प्रदान करणे करीता सादर करण्यात आला आहे. परंतु, सद्यस्थितीत सर्वसाधारण सभा अस्तित्वात नसल्याने सर्व सभेचे अधिकार प्रशासक यांना असल्याने सदर प्रशासकीय विषयास मंजुरी प्रदान करण्यात येत आहे.

ठराव मंजुर व कायम

**स्वा/-**
**प्रशासक,**
**महानगरपालिका,अमरावती**

**स्वा/-**
**नगरसचिव,**
**महानगरपालिका,अमरावती**

नगरसचिव
महानगरपालिका, अमरावती.